Vol 2 Issue 6 March 2013

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.in**

*Review Of Research*
Vol.2, Issue.6, March. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

RESEARCH PAPER

# *छत्रपती संभाजी महाराज–मराठा इतिहासातील एक दुर्देवी व्यक्तिरेखा*

***अनिल माणिकराव बैसाणे,***

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

***सारांश :***

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेकडो वर्ष गुलामगिरीत राहिलेल्या मराठी समाजाला 'स्वराज्य' मिळवून दिले. त्यांच्या निधनानंतर या स्वराज्याच्या रक्षणाची दुर्धर जबाबदारी संभाजी महाराजांवर आली. वास्तविक शिवाजी महाराजानंतर संभाजी महाराजांना कायदेशीर मराठा स्वराज्याची गादी मिळावयास हवी होती. मात्र स्वकीयांनीच कटकारस्थाने करून विश्वासघाताचा अवलंब केला. अशा परिस्थितीत औरंगजेब मोठ्या लष्करी सामर्थ्यांसह चालून आला. संभाजी महाराजांनी हतबल न होता स्वकीयांचा बंदोबस्त करून औरंगजेबाविरूद्ध लढा दिला. साधारणतः ८ ते ९ वर्षे मराठ्यांच्या औरंगजेबाविरूद्धच्या लढ्याचे नेतृत्व करून मोठ्या पराक्रमाने स्वराज्याचे रक्षण केले. शेवटी संभाजी महाराज शत्रुच्या कचाट्यात सापडले. बादशहाने त्यांना क्रूरपणे ठार केले. संभाजी महाराजांच्या हौतात्म्याने मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे एक पर्व संपले तरी त्यातूनच मराठ्यांना स्फूर्ती मिळाली आणि मराठे बादशाही फौजांविरूद्ध लढत राहीले. मात्र बादशहाला यश आले नाही. त्याचा महाराष्ट्रातच अंत झाला.

### *प्रस्तावना :*

छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वर मुक्कामी पकडण्यात येवून त्यांना पेडगाव येथील बहादुरगडावर बादशहा समोर आणण्यात आले. तर पुढे तुळापूर येथे पवित्र संगमावर त्यांना हाल–हाल करून ठार मारण्यात येवून वढु बु।। येथे त्यांच्या शरीराचे तुकडे फेकण्यात आले. आज संगमेश्वर येथील ठिकाणी संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे तर तुळापूर येथे त्यांचे भव्य स्मारक आणि वढु बु।। येथे त्यांची व कवी कलश यांची समाधी स्थळे आहेत.

### *संभाजी महाराजांचा राज्यारोहण :*

महाराजांच्या निधनानंतर रायगडावर कारभाऱ्यांनी राजारामास गादीवर बसवून पन्हाळ्यावर असलेल्या संभाजी महाराजांवर फौजा पाठविण्यात आल्या. मात्र हंबीरराव मोहिते यांनी संभाजी महाराजांची बाजू घेतली. रायगड ताब्यात घेवून १६ जानेवारी १६८० रोजी संभाजी महाराजांनी स्वतःला राज्यभिषेक करवून घेतला.[१]

### *संभाजी महाराजांचा पराक्रम :*

याचवेळेस बादशहा औरंगजेब पुत्र अकबराने बापाविरूद्ध बंड करून संभाजी महाराजांना येवून मिळाला. म्हणून बंडखोर मुलगा आणि त्याला आश्रय देणाऱ्या संभाजीनां शासन करण्याकरिता औरंगजेब स्वतः

दक्षिणेत चालून आला. सन १७०७ पर्यंत दक्षिणेत मोगल–मराठा संघर्ष चालू होता. या प्रदीर्घ लढ्यालाच आपल्या देशाच्या इतिहासामध्ये 'मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध' म्हणून ओळखले जाते.

संभाजी महाराजांनी स्वराज्यद्रोह्यांचा बंदोबस्त करून एकाचवेळी मोगल, सिद्दी, पोर्तुगीत अशा तीन शत्रूंशी लढा दिला. यात त्यांचे लष्करी संयोजन व नेतृत्वाचे गुण प्रकट होतात. अकबराला आपल्या फौजा देवून उत्तरेत पाठविण्याचे दोन–तीन वेळा प्रयत्न केलेत. हा प्रयत्न अपुऱ्या साधन–सामुग्रीमुळे अपयशी झाला असला तरी संभाजी महाराजांचे धाडस हे कौतुकास्पदच होते. तसेच पोर्तुगीजांना वठणीवर आणले तर सिद्दी व मोगलांच्या विरूद्ध इंग्रजांचे सहकार्य मिळविले. पहिल्या कालखंडात औरंगजेबास यश आले नसल्यानेच तो विजापूर व गोवळकोंड्यांच्या मोहिमांवर निघून गेला. औरंगजेब विजापूरवर चालून गेला. तेव्हा बादशाही प्रदेशांवर हल्ले चढवून मोगलांचे लक्ष विचलीत केले तर गोवळकोंडा वेढ्याप्रसंगी कुतुबशहास मदत केली. संभाजी महाराजांनी मोठ्या शैर्याने मोगली आक्रमणाशी ८–६ वर्षे लढा दिला यातच महाराजांची कार्यतत्परता दिसते.[२]

### *संभाजी महाराजांची कैद :*

महाराजांकडून पराभूत झालेल्या शिर्क्यांनी शेख निजामास मदत केली. त्यांनी संगमेश्वरावर हल्ला चढवून बेसावध संभाजी महाराजांना कैद केले. बादशाही हुकूमानुसार महाराजांना पेडगाव येथील बहादुरगडावर नेण्यात आले. शरणागती न पत्करता अत्यंत स्वाभिमानाने स्वराज्याकरिता महाराजांनी बलिदान दिले. तुळापूर येथे महाराजांना ११ मार्च १६८६ रोजी क्रूरपणे ठार करण्यात आले. बादशहाला मराठ्यांचे राज्य बुडाल्याचे वाटले. मात्र संभाजी महाराजांच्या हौतात्म्याने स्वातंत्र्यदेवतेचे होमकुंड प्रज्वलित झाले आणि असंख्य मराठ्यांना आपल्या प्राणाची आहुती देण्यास प्रवृत्त केले.[३] संभाजी महाराजांना ठार करण्याची मोठी राजनैतिक चूक झाल्याचे बादशहाला कळले कारण प्रायश्चित्त म्हणून बादशहाला १८–१६ वर्षे मराठ्यांविरूद्ध झुंजावे लागले व त्यातच त्याचाही अंत झाला.

### *संभाजी महाराजांचे स्मारक :*

पुण्याहून नगरकडे जातांना कोरेगाव भिमा फाट्यावर डाव्या बाजूला वळून पुढे ५ ते ७ कि.मी. तुळापूर हे भिमा–भामा–इंद्रायणी या पवित्र नद्यांच्या संगमाचे ठिकाण आहे. या पवित्रस्थळी संगमेश्वराचे प्राचीन मंदिर असून त्याचे बांधकाम काळ्या चिरेबंदी दगडात झालेले आहे. या संगमावर राजे–महाराजे तुळा करीत असल्यामुळे या गावाला तुळापूर असे नाव पडले असल्याचे सांगितले जाते. संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे सरदेसाईंच्या वाड्यात बेसावध असतांना कैद करून अणुस्कारा घाट–कोलपूर–कऱ्हाड, वडुज, दहिवडी, फलटण, बारामती मार्गे बहादूरगडावर धिंड काढून आणण्यात आले. तेथून बादशाही फर्मानानुसार तुळापूर येथे महाराजांना नेले.



मात्र या दरम्यान कोणाही मराठा सरदाराने किंवा सैन्याने बादशाही छावणीवर हल्ला चढवून आपल्या लाडक्या छत्रपतीच्या सुटकेकरिता प्रयत्न केल्याचे दिसत नाही. १ फेब्रुवारी १६८६ ते ११ मार्च १६८६ या ४० दिवसाच्या काळात कानात शिशचा उकळता रस टाकणे, जिभ हडसून काढणे, तापलेल्य ा सळईने डोळे काढणे, त्वचा सोलून काढणे अशा प्रकारची क्रूर हेटाळणी, अवहेलना व कमालीच्या शरीरिक यातना देत. छत्रपती संभाजी व त्यांचे जीवलग मित्र कवी कलश यांच्या शरीरांचे तुकडे–तुकडे करून ते तुळापूरच्या भिमा–भामा–इंद्रायणीच्या संगमाच्या पलीकडे वढू बु।। या लहानश्या गावाच्या हद्दीत फेकून देण्यात आले. मराठ्यांच्या छत्रपतीला आपण ठार केल्याचा जल्लोष औरंगजेब व त्यांचे हितचिंतक यांनी साजरा केला. औरंगजेबाच्या दहशतीमुळे संभाजी महाराजांचा धार्मिक संस्कारसुद्धा करण्याची कोणी तयारी दाखविली नाही. कोणीही पुढे आले नाही. आज तुळापूरला जेथे संभाजी महाराजांना ठार करण्यात आले तेथे स्मारक उभारण्यात आले आहे. संगमेश्वर महादेवाच्या मंदिरासमोरच हे स्मारक आहे. पुढील परिसरात महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. स्मारकाच्या डाव्या बाजूला खालच्या अंगाला (नदीच्या बाजूला) प्रेत दाहिनीची

अलीकडे व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र काही जाणकारांना हे रूचले नाही कारण संभाजी महाराजांच्या बलीस्थान असलेल्या पवित्र भूमिचा हा अपमान आहे. म्हणून येथे स्मशानभूमीचे स्वरूप प्राप्त करणाऱ्या वृत्तीचा निषेध करून ह्या स्मारकास राष्ट्रीयत्वाचा दर्जा देणे आवश्यक आहे.[४]

### *संभाजी महाराज व कवी कलश समाधी स्थळे :*



तुळापूर हे भीमाच्या पश्चिम तळावर असून तेथे महाराजांचे स्मारक आहे. याचठिकाणी संभाजी महाराजांना साखळदंडात जखडेल्या अवस्थेत हाल-हाल करून ठार करण्यात आले. तेथे महाराजांचे स्मारक उभारण्यात आले आहे. तर याच ठिकाणाहून नदी पार करून पूर्वेस असलेल्या वढू बु।। परिसरात अंत्यसंस्कार झाले असल्याने तेथे समाधीस्थान आहे. या परिसरात आजस्थितीस चांगले बांधकाम असून संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. येथे संभाजी महाराजांची लहान छत असलेली त्याच्या पूर्वेस कवी कलश यांची तशाच बांधकामातील समाधीस्थळे आहेत. ह्या समाधी स्थळांचे बांधकाम छत्रपती शाहू महाराजांनी मोगली कैदेतून सुटून आल्यानंतर केले आहे.[५]

या समाधीस्थळाची पूजा, नैवेद्य, धूप, नंदादीप इत्यादीसाठी भिकाराम गोसावी व वासुदेव भट यांना जमीन इनाम दिली. ही बागायती जमीन वृंदावनाजवळच असल्याचा उल्लेख कागदपत्रातून वाचावयास मिळतो. तसेच वृंदावनाची सेवाचाकरी गोविंद गोपाळ ढगोजी मेगोजी करीत असल्यामुळे शाहू महाराजांनी त्यांना पड जमीनीपैकी काही जमीन इनाम दिली होती. संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्या दाट झाडीतील या समाधी स्थळांचा शोध संशोधक कै. वा. सी. बेंद्रे यांनी सन १९३९ मध्ये लावला. तर सन १९६० मध्ये राज्याचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने समाधी स्थळांचा जीर्णोद्धार झाला. दरवर्षी फाल्गुनी अमावस्येला संभाजी महाराज स्मृती समिती ग्रामपंचायत वढु बु।। ग्रामस्थ व शंभूभक्त 'बलिदान दिन' साजरा करतात.[६]

संभाजी महाराजांची समाधी ही चौथरा आणि त्याच्या चार बाजूला चार दगडी घडीव स्तंभ आहेत. या स्तंभावर घुमटाकार छत व कळस आहे. अलीकडे वॉलकंपाऊंड व लोखंडी गेट बसविण्यात आले आहे तर बाजुलाच कवी कलश समाधीचा नुसताच चौथरा असावा असे दिसते. नंतरच्या काळात या चौथऱ्यावर चार स्तंभ बांधून संभाजी महाराजांच्या समाधीप्रमाणे वर घुमटावर छत उभारण्यात आले आहे. या समाधीच्या पश्चिम बाजूच्या भिंतीवर कवी कलश यांनी बहादूरगडावर जखडलेल्या अवस्थेत संभाजी महाराजांच्या धैर्य आणि पराक्रमावर प्रसन्न होवून औरंगजेबासमोर १५ फेब्रुवारी १६८९ रोजी म्हटलेले काव्य त्यांच्या अन्वयार्थासह लावले आहे.[७]

### *गोविंद गोपाळ व सहकारी वीरांचे धाडस :*

ही दोन्ही समाधी स्थळे व वढू बु।। या गावाच्या दक्षिण बाजूस दलित वस्तीत आहेत. पश्चिमेस असलेल्या गावाच्या गावकुसाच्या दोन दगडांच्या मोठ्या शेंदूर फासलेल्या खुणा आहेत. स्थानिक रहिवाशांकडून काही महत्त्वाची माहिती मिळाली. दलित वस्तीत एका बाभळीच्या झाडाखाली १० ते १२ वीरांच्या मूर्त्या अस्ताव्यस्त पडलेल्या आहेत. तर एका चौथऱ्यावर गोईद अक्षर देवनागरी लिपीत कोरलेले असून ती गोविंद गोपाळ या दलित धाडशी व्यक्तिची असल्याचे सांगितले जाते. संभाजी महाराजांच्या शरीराचे तुकडे-तुकडे करून फेकण्यात आले होते. अंधाऱ्या रात्री वढू गावातील काही धाडसी वीरांनी हे तुकडे उचलले एका गोणपाटात गोळा केले ते गोणपाट शिवले. ज्यांनी उचलले ते 'उचले' आणि ज्यांनी शिवलेत ते 'शिवले' अशा अडनावांनी प्रसिद्ध झालेत. गोणपाटात शरीराचे तुकडे असलेल्या शवावर आहे त्या परिस्थितीत अंत्यसंस्कार केला. समाधी स्थळांच्या दक्षिण बाजूस दोन मुर्त्या बसविलेल्या आहेत. त्यांची नावे 'शिवले', 'देशमुख' अशी लिहीलेली आहेत. मात्र हे एखाद-दुसरे मराठे सोडले तर इतर १० ते १२ जण हे दलित होते. त्यांचा नामोल्लेख कुठेही आढळत नाही. मात्र या धाडसी दलित तरूणांचा म्होरक्या हा गोविंद गोपाळ होता. या १० ते १२ वीरांच्या मूर्त्या आजही दलित वस्तीत पडून आहेत. त्यांनी संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्यावर अग्निसंस्कार केलेत म्हणून औरंगजेबाने त्यांना शिक्षा देवून कत्तल केली. त्यांनाच वीर म्हणून ओबड-धोबड दगडी मूर्त्या स्वरूपात बसविले आहे. असे असले

तरी वढु बु ।। मध्ये या वीरांचे आज कोणीही वारस नाहीत कारण औरंगजेबाच्या अत्याचारामुळे गावातील दलित वस्ती निर्मनुष्य बनली होती. पुढे काही काळाने गावाकीकरिता महाराची आवश्यकता असल्याने गायकवाड कुळातील कुटूंब येथे आणल्याने त्यांच्या विस्तारातील दलित वस्ती आज आहे.[८]

थोडक्यात शिवाजी महाराजांच्या निधनानंतर बंडखोर मुलगा अकबर व त्याला आश्रय देणाऱ्या संभाजी महाराजांना प्रायश्चित्त करण्याकरिता जरी औरंगजेब महाराष्ट्रात आला असला तरी बादशहा स्वराज्याचा आणि हिंदू धर्माचा कट्टर हाडवैरी होता. भारतभर इस्लामचा प्रसार आणि आपल्याच साम्राज्याचा अफाट विस्तार व्हावा याकरिता हयातभर रक्त सांडविले. महाराष्ट्रात आल्यावर स्वराज्य बेचिराख करणाऱ्या बादशहाचे मनसुबे शिवराय पुत्र संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने उधळून लावले. म्हणूनच हतबल झालेल्या बादशहाने आदिलशाही व कुतुबशाहीकडे मोर्चा वळविला. यातच संभाजी राजांचा पराक्रम सिद्ध होतो. मात्र जन्मतःच आईच्या प्रेमाला पारखे झालेल्या संभाजी महाराजांविरूद्ध आप्तेष्टांनीच फितुरी करणे, थोरला पुत्र असूनही त्यांच्याविरूद्ध मंत्र्यांनीच कट–कारस्थाने करून त्यांचा वारसा हक्क नाकारणे. औरंगजेबाच्या कैदेत असतांना त्यांच्या सुटकेकरिता कोणताही प्रयत्न न होणे. एवढ्यावरच संभाजी महाराजांची अवहेलना थांबत नाही तर त्यांच्या मृत्यूनंतर शत्रुत्व संपल्याची जाणीव औरंगजेबास करून देवून त्यांच्या देहावर धार्मिक संस्कार करण्याचे धाडसही धर्माभिमान्यांनी दाखविले नाही. म्हणूनच मराठ्यांच्या इतिहासात संभाजी महाराज ही व्यक्तिरेखा एक शोकांतिकाच ठरली असेच वाटते.

***संदर्भ :–***


१) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह. (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, शिवाजी आणि शिवकाल (१६००–१७०७), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६,पृ. ३८२

२)आचार्य डॉ. धनंजय, मराठा सत्तेचा उदय (१६००–१७०७), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २८६.

३) देशपांडे डॉ. प्र. न., मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, क्र.१२६, पुणे, २००१, पृ. २०२

४)ॲड. आय. जी. पाटील, मुलाखत, दि. ४ नोव्हेंबर, २०१०.

५)देशपांडे डॉ. प्र. नं. उपरोक्त, पृ. २०३.

६)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. २२ मे २०११ण

७)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. २२ मे २०११

८)श्री. ओव्होळ गुरूजी, वढू बु ।। मुलाखत, दि. २२ मे २०११





***अनिल माणिकराव बैसाणे***

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.in